जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३२६ दिनांक - १७/०८/२०२४**

गुन्हे शाखा, युनिट-४, पुणे शहर.

# रात्री घरफोडी करणा-या आरोपीतांना केले जेरबंद

यातील फिर्यादी यांचे बहिणीचे कल्याणीनगर पुणे येथील दुकान दिनांक ०६/०८/२०२४ बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने दुकानाची खिडकी तोडुन आत प्रवेश करुन दुकानातील रोख रक्कम व ०६ नग कपडे असे एकुण १,९९,०००/-रु.चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला त्याबाबत येरवडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे.

गुन्हे शाखा, युनिट-४ कडील पोलीस उपनिरीक्षक, वैभव मगदुम, व पथकाने घटनास्थळ व आजुबाजुचे ठिकाणी उपलब्ध असलेले सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करत-करत रांजणगाव, संकल्प सिटी गणेगाव रोड, येथे जावुन येथील स्थानिक नागरिकानां आरोपीतांचे फोटो दाखवुन तपास सुरु केला. असता बातमीदार कडुन बातमी मिळाली की,फोटोतील वर्णनांचे इसम हे संकल्प सिटी, मधील मानवी अर्पामेंट रांजणगाव पुणे येथे भाडयाने राहणेस आहे.अशी खात्रीशिर बातमी मिळाली त्या प्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक. श्री.अजय वाघमारे, व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.रविंद्र शेळके, येरवडा पो. स्टे. व यांना माहीती दिली.असता त्यांनी बातमीप्रमाणे खात्री करुन कारवाई करणेचे आदेश दिले.

त्याप्रमाणे पोलीस स्टाफ संकल्प सिटी, मानवी अर्पामेंट रांजणगाव येथे पाळत ठेवुन थांबले असता दिनांक १५/०८/२०२४ रोजी तीन इसम मानवी अर्पामेंटचे पार्किंग मधील पल्सर मोटार सायकलजवळ, आले असता सदर संशयीत इसमांस घेराव घालुन त्यांना ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **१) विवेक उर्फ गुरुदेव मनिराम राजपुत वय ३० वर्षे सध्या रा. संकल्प सिटी, मानवी अर्पामेंट फ्लॅट नं. १०३, रांजणगाव पुणे मुळगाव-गाव-बिरपुर, सहकारी शाळेजवळ, ता. जि. मैनपुर,उत्तर प्रदेश २)अभिषेकसिंग उर्फ प्रदिप पप्पुसिंग वय २५ वर्षे सध्या रा. संकल्प सिटी, मानवी अर्पामेंट फ्लॅट नं. १०३, रांजणगाव पुणे मुळगाव- गाव-खमवली, अमरनाथ मंदीराच्या बाजुला, ता. उन्नावजि. कानपुर राज्य-उत्तर प्रदेश ३)अमितसिंग विजयसिंग वय ३१ वर्षे सध्या रा.संकल्प सिटी, मानवी अर्पामेंट फ्लॅट नं. १०३, रांजणगाव पुणे मुळगाव-गाव-मह्, सहकारी शाळेच्या शेजारी,ता.बबेरु.जि.बांधा,राज्य-उत्तर प्रदेश** असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे दाखल गुन्हया बाबत विचारपुस करता त्यांनी दिनांक ०७/०८/२०२४ रोजी कल्याणीनगर पुणे येथील एक बंद दुकानामध्ये प्रवेश केला. दुकानातील १)रोख रक्कम व २) दोन शर्ट व ३)एक लेडीज ड्रेस असे चोरी केली असुन त्याचे ताब्यामध्ये मिळालेली रोख रक्कम, व दोन शर्ट, एक लेडीज ड्रेस व पल्सर मोटार सायकल असा एकुण १,१६,०००/-रु.किं.चा मुद्देमाल मिळून आला.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त गुन्हे श्री.निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री. सतिश गोवेकर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अजय वाघमारे,येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.रविंद्र शेळके यांचे मार्गदर्शनात युनिट ४ कडील पोलीस उपनिरीक्षक जयदीप पाटील, पोलीस उपनिरीक्षक,वैभव मगदुम, पोलीस उपनिरीक्षक, स्वप्नील पाटील, येरवडा पो. स्टे. पोलीस अंमलदार हरिष मोरे,प्रविण भालचिम, संजय आढारी,विशाल गाडे,एकनाथ जोशी,नागेसिंग कुंवर,विनोद महाजन,जंहागीर पठाण,वैभव रणपिसे,राहुल परदेशी, देविदास वांढरे,विशाल इथापे,मनोज सांगळे व येरवडा पो.स्टे.कडील पोलीस अंमलदार सुशांत भोसले व प्रशांत कांबळे यांनी केली आहे.


पुणे शहर
युनिट क्र.४
फोन नं. २६२०८४६५
Crime Branch
Pune City
UNIT NO. 4
E-5, Rangehills Road, Khadki,
Pune - 20
PH NO. 26208465